ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-IV July - August 2021

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास

**मार्गदर्शक**
**डॉ. एस. एस. देशपांडे**
सहयोगी प्राध्यापक
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
कोल्हापूरतचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद

**बाबासाहेब बलभीम पवार**
संशोधक विद्यार्थी
शारिरीक शिक्षण विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**प्रस्तावना :**

व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासात त्याच्या प्रत्येक विकासावस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परिपक्वता आणि अनुभव यांच्या परिणामातून घडून येणाऱ्या परिवर्तनाच्या प्रगतीसुचक मालिकेस विकास असे म्हणतात.

CC BY

*Aarhat Publication & Aarhat Journals*is licensed Based on a work at*http://www.aarhat.com/eiirj/*

प्रत्येक विकासावस्थेमध्ये व्यक्तीमध्ये विविध प्रकारचे बदल घडून येत असतात. मात्र ज्या कालखंडात विकास प्रक्रियेला गती मिळून अनेक बदल घडतात. त्या बदलाची जाणीव संबंधीतांना तीव्रपणे होते. तो कालखंड म्हणजे कुमारावस्था होय. ज्याला इंग्रजीमध्ये टीन एजर्स असे संबोधले जाते. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी हे कुमारवस्थेतील असतात. त्यांच्या भावनांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. थोडक्यात विद्यार्थ्यांना स्वतःच्या व इतरांच्या भावना ओळखणे, भावनांची देखरेख करणे, त्यांचे नियमन व नियंत्रण करणेसाठी सक्षम बनविणे तसेच आपले विचार व कृती यांना मार्गदर्शन करण्यासाठी भावनाचा उपयोग करण्यास शिकवणे तसेच सभोवतालची परिस्थिती व समस्यांची स्वतःच्या व इतरांच्या नातेसंबंधात जुळवून घेण्याच्या प्रभावी आंतरक्रिया करण्यासाठी उपयोगाचे भाव असण्याची क्षमता म्हणजे भावनिक बुद्धिमता होय. खरेतर भवनिक बुद्धिमता म्हणजे हृदय व मस्तक यांचे सुयोग्य मिश्रण होय.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-IV July – August 2021

**भावनिक बुद्धिमतेची चार क्षेत्रे खालीलप्रमाणे :**

१) भावनांची ओळख - स्वत:च्या व इतरांच्या भावना ओळखणे.

२) भावनांची ग्राह्यक्षमता (एकात्मीकरण) विचार प्रक्रियेत भावनांचे उपयोजन करणे.

३) भावनांचे आकलन : स्वत:चे विचार व वर्तन आणि भावना यामधील परस्पर संबंधीचे अचुक आकलन करण्याची समजण्याची क्षमता.

४) भावनांचे व्यवस्थापन : भावनांचे नियमन व नियंत्रणाची क्षमता याद्वारे ध्येयावर लक्ष केंद्रीत करून त्यानुसार योग्य वर्तन करणे व अयोग्य वर्तनाला स्वयं-सुचनेमार्फत नियंत्रण करणे म्हणजे भावनांचे व्यवस्थापन करणे.

शाळेच्या शिस्तप्रिय बंदिस्त वातावरणातून कुमार खुल्या व मोकळया वातावरणात असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतो. कौमार्यवस्थेत झपाट्याने होणारे शारिरीक बदल कॉलेजजीवनाचे आकर्षण त्याचवेळी पुढील आयुष्यात नेमके काय करायचे? काय व्हायचे? आपल्याला कोणत्या जबाबदाऱ्या भावी काळात पेलायच्या आहेत यामुळे कुमार गोंधळून गेलेले असतात. त्यामुळे भावना ओळखण्यास, समजण्यास, नियंत्रण करण्यास भावनिक बुद्धिमतेला कसे महत्व आहे. याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**गरज आणि महत्व :**

आज कोणतेही वर्तमानपत्राचे वाचन करीत असतांना त्यामध्ये अस्थिर भावनिक विश्व समोर येते. मग त्या दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना आत्महत्येच्या स्वरूपात असतील किंवा प्रेमभंग त्यातील निराशा किंवा प्रेमभंगामुळे होणारे दुर्देवी प्रकार असतील.

आज आपल्याला भावनांचे व्यवस्थापन समजले पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्या तसेच इतरांच्या भावनांची जाणीव त्यांना झाल्यास व त्याचे योग्य व्यवस्थापन त्यांना झाल्यास व त्याचे योग्य व्यवस्थापन त्यांना करता आल्यास त्यांच्यात आत्मविश्वास वाढीस लागेल, जो त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात तसेच यश मिळण्यास महत्वपुर्ण असेलच मात्र वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात ही मैलिक असेल.

आजच्या काळात ज्यांची भावनीक बुद्धिमता चांगली आहे. त्यांच्या हाती यशाची किल्ली आहे. असे म्हणावे लागेल. कारण योग्य वेळी योग्य भावनांचे योग्य प्रगटीकरण व्यक्तीला यशाच्या शिखरावर पाठवितात. असा अनुभव आहे.

**समस्या विधान :**

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळीवर तुलनात्मक फरक अभ्यासणे.

२. संशोधनाची परकिल्पना : माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता उच्च पातळीची असेते.

**संशोधनाची शून्य परिकल्पना :**

माध्यमिक स्तरावरील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमतेच्या पातळीत फरक नाही.

**संशोधन पद्धती :**

सदरील अभ्यास हा सर्वक्षण पद्धतीने पूर्ण केला.

**संशोधन नमुना :**

नमुन्यामध्ये औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकडून १०० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड केली. त्यामध्ये ५० कला शाखा व ५० विज्ञान शाखांचे विद्यार्थी आहेत.

**संशोधनाची साधने :**

सदरील अभ्यासाच्या माहिती संकलनासाठी भावनिक बुद्धिमत्ता **शोधिका एस. के. मंगल यांची** चाचणीचा वापर केला.

**माहिती संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

संकलीत माहितीचे ही परिक्षीका तालीकीकरण करून मध्यमान, प्रमाण विचलन व यांच्या साह्याने संकलीत माहितीच विश्लषेण केले.

परिकल्पना क्रमांक १. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता उच्च पातळीची आहे.

**तक्ता क्र. १ विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळी बाबत**

| नमुना | माध्यमान | प्रमाण विचलन | विस्तार |
|---|---|---|---|
| ५० | ७१.४२ | १०.९५ | ७०-७५ |

तक्ता क्रमांक १ मध्ये माध्यमिक स्तरावरील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता संख्याशास्त्रातील मध्यमान, प्रमाण विचलनाद्वारे काढला आहे.

माध्यमिक स्तरावरील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मिळालेल्या प्राप्तांकानूसार मध्यमान हे ७१.४२ आले तर प्रमाण विचलन १०.९५ आहे. मध्यमान हे विस्तार ७१.७५ या दरम्यान येते.

म्हणून विज्ञान शाखेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्तेची पातळी चांगली दिसून येते.

**तक्ता क्र. २ कला शाखेतील खेळडू विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळीबाबत**

| नमुना | माध्यमान | प्रमाण विचलन | विस्तार |
|---|---|---|---|
| ५० | ७४.२ | ९.४७ | ७१-७५ |

तक्ता क्र. २ मध्ये असे दिसून येते की, माध्यमिक स्तरावरील कला शाखेतील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता संख्याशास्त्रीय प्रणालीद्वारे काढली आहे.

माध्यमिक स्तरावरील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या मिळालेल्या प्राप्तांकानुसार मध्यमान ७१-७५ च्या दरम्यान येते. म्हणून कला शाखेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता पातळीचा तुलनात्मक अभ्यास.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-IV July - August 2021

**तक्ता क्र. ३**

| विद्यार्थी | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य | टेबल मुल्य | सार्थकता मध्यमातील फरक हा सार्थक आहे |
|---|---|---|---|---|---|
| विज्ञान शाखा | ७१.४२ | १०.९५ | | | फरक सार्थक आहे. |
| कला शाखा | ७४.२ | ९.४७ | ३.६१ | १.९८ | |

तक्ता क्र. ३ नुसार असे निदर्शनास येते की, विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ताचे T मुल्य ३.६१ हे (सार्थकता स्तर .०५ या स्तरावर) टेबल मुल्य १.१८ पेक्षा अधिक आहे. म्हणून माध्यमातील फरक हा सार्थक आहे.

यावरून माध्यमिक स्तरावरील विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता पातळीमध्ये सार्थक फरक असल्याचे दिसून येते.

याचा अर्थ माध्यमिक स्तरावरील विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणिय फरक दिसून येतो.

**निष्कर्ष :**

१. माध्यमिक स्तरावरील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता पातळी चांगली आहे.

२. माध्यमिक स्तरावरील कला शाखेतील भावनिक बुद्धिमत्ता विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेपेक्षा चांगली दिसून आली.

**शिफारशी :**

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता पातळीमध्ये सकारात्मक बदल होण्यासाठी कॉलेजमध्ये कार्यशाळा, उद्‌बोधन वर्ग, मार्गदर्शन, समुपदेशन, कार्यशाळांचे आयोजन करावे.

**संदर्भग्रंथ :**

१. बेस्ट जे. डब्ल्यु (१९९५), रिसर्च इन एज्युकेशन (७ वी आवृत्ती) नवी दिल्ली, प्रेन्टीस हॉल ऑफ इंडीया प्रायव्हेट लिमिटेड.

२. गोलमन डी. (१९९५), भावनिक बुद्धिमत्ता (पहिली आवृत्ती) न्युयॉर्क, बॅन्टम बुक्स.

३. Asthana Bipin (२००५), Measurment and Evaluation in Psychology and Education Ed.८ Agra: Vinod Pustak Mandir.